2 JUN 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण :** राज्यातील 'एनएसएस'चे बाराशे स्वयंसेवक सहभागी

# शिवाजी विद्यापीठात 'आव्हान'ला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यपाल तथा कुलपती यांच्या कार्यालयाकडून आयोजित केलेल्या 'आव्हान २०१७' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरास गुरुवारी शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. दहादिवसीय शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

विद्यापीठाच्या लोककला सभागृहात सकाळी नऊ वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत शिबिराचा प्रारंभ झाला. यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीत सापडलेल्यांना वाचविणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्यांना मदतीसाठी जाणाऱ्यांनी स्वत:ची सुरक्षा जपणेही महत्त्वाचे आहे. 'एनएसएस'चे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे म्हणाले, या प्रशिक्षण शिबिरामधून १०० उत्कृष्ट शिबिरार्थी निवडून त्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एन.डी.आर.एफ.) तळेगाव येथील शिबिरात विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कार्यक्रमात एन.डी.आर.एफ.चे निरीक्षक एस. डी. इंगळे यांनी शिबिराविषयी माहिती दिली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाचे एन.एस.एस.चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, आदी उपस्थित होते. दरम्यान, या शिबिराचे औपचारिक उद्घाटन आज, शुक्रवारी दुपारी चार वाजता कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते होणार आहे.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. डी. के. गायकवाड, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, 'एनडीआरएफ'चे निरीक्षक सी. डी. इंगळे, एनएसएसचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

## विविध मुद्द्यांबाबत मार्गदर्शन

विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह, राजर्षी शाहू सभागृह, संगीत व नाट्यशास्त्र विभाग, निलांबरी सभागृह आणि वि. स. खांडेकर सभागृह या ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात झाली. यात दिवसभरात एन.डी.आर.एफ. प्रथमोपचार प्रतिसाद, कोसळलेल्या इमारतीमध्ये तातडीने वैद्यकीय मदत व पुनर्वसन, पूर परिस्थितीत मदत व पुनर्वसनाचे शिबिर सुरु करणे, आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये एन.डी.आर.एफ.चे मार्गदर्शक योगा, भूमी आपत्ती व्यवस्थापन, जल आपत्ती व्यवस्थापन, जीवरक्षा, मदत व पुनर्वसन कार्य, मूल्यशिक्षण, आदींविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# आपत्काळात स्वसुरक्षाही महत्त्वाची

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'कोणत्याही आपत्तीवेळी मदतीसाठी जाणाऱ्यांनी स्वत:ची सुरक्षा जपणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरूवारी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित दहा दिवसांच्या 'आव्हान-२०१७' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरच्या अनौपचारिक उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. लोककला सभागृहात कार्यक्रम झाला. दरम्यान, शिबिराचे औपचारिक उदघाटन शुक्रवारी (ता. २ जून) सायंकाळी ४ वाजता विषेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते होईल.



शिवाजी विद्यापीठात 'आव्हान-२०१७' शिबिराला राज्यभरातून एनएसएसचे स्वयंसेवक उपस्थित आहेत.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन**

डॉ. शिंदे म्हणाले, 'प्रशिक्षणाचा उपयोग केवळ शिबिरापुरताच न करता भावी आयुष्यातही त्याचा समाजासाठी करावा. प्रशिक्षणाचा दैनंदिन आढावा घेण्यासाठी सर्व प्रशिक्षण स्थळांना आपण स्वत: भेट देणार आहे.'

प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांनी या प्रशिक्षण शिबिरामधून १०० उत्कृष्ट शिबिरार्थी निवडून त्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) तळेगाव येथील शिबिरात विशेष प्रशिक्षण देणार असल्याचे सांगितले. एनडीआरएफचे निरीक्षक एस. डी. इंगळे यांनी शिबिरार्थींना माहिती दिली. सुमारे १२०० विद्यार्थी प्रशिक्षणात सहभागी झाले आहे. कार्यक्रमास प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीआरएफचे निरीक्षक सी. डी. इंगळे, विद्यापीठाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

- 2 JUN 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्काळात बचावकर्त्यांची स्वसुरक्षा महत्त्वाची : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीत सापडलेल्यांना वाचविणे जितके महत्त्वाचे तितके त्यांना मदतीसाठी जाणाऱ्यांनी स्वतःची सुरक्षा जपणेही महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी सकाळी येथे केले. राज्यपाल कार्यालयाकडून आयोजित 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरास गुरुवारी सकाळी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात प्रारंभ झाला.

या शिबिरात राज्यभरातून राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे १२०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पहिल्या दिवशीच्या प्रशिक्षण सत्रास सुरुवात झाली. यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांनी १०० उत्कृष्ट शिबिरार्थी निवडून त्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एन.डी.आर.एफ.) तळेगाव येथील शिबिरात विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले. एनडीआरएफचे निरीक्षक एस.डी. इंगळे यांचे भाषण झाले. या प्रशिक्षणात योगा, भूमी आपत्ती व्यवस्थापन, जल आपत्ती व्यवस्थापन, जीवरक्षा, मदत व पुनर्वसन कार्य, मूल्यशिक्षण आदींविषयी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड उपस्थित होते.

**विशेष पोलिस महानिरीक्षक नांगरे-पाटील यांच्या हस्ते आज उद्घाटन**

या शिबिराचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २) सायंकाळी ४ वाजता कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात हा कार्यक्रम होईल.

2 JUN 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आव्हान २०१७ शिबिरास शिवाजी विद्यापीठात प्रारंभ

कोल्हापूर, ता. १ : कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीत सापडलेल्यांना वाचविणे जितके महत्त्वाचे तितके त्यांना मदतीसाठी जाणाऱ्यांनी स्वतःची सुरक्षा जपणेही महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज सकाळी येथे केले.

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती यांचे कार्यालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या आव्हान २०१७ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरास विद्यापीठाच्या प्रशस्त लोककला सभागृहात प्रारंभ झाला. या वेळी ते बोलत होते. राज्यभरातून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे १२०० स्वयंसेवकांच्या उत्साहात पहिल्या दिवशीच्या प्रशिक्षण सत्रास कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली.

या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीआरएफचे निरीक्षक सी. डी. इंगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांनी या प्रशिक्षण शिबिरामधून १०० उत्कृष्ट शिबिरार्थी निवडून त्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या तळेगाव येथील शिबिरात प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती दिली.

एनडीआरएफचे निरीक्षक एस. डी. इंगळे यांनी शिबिरार्थींना शिबिराविषयी थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर विद्यापीठाच्या पाच विविध सभागृहांत प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या प्रशिक्षणात एन.डी. आर.एफ.चे मार्गदर्शक योगा, भूमी आपत्ती व्यवस्थापन, जल आपत्ती व्यवस्थापन, जीवरक्षा आदींविषयी मार्गदर्शन करणार आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'आव्हान-२०१७' प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

## उद्घाटन समारंभ उद्या सायंकाळी

**शिबिराचे औपचारिक उद्घाटन उद्या (ता. २ जून) दुपारी चार वाजता कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते होणार आहे. लोककला सभागृहात हा कार्यक्रम होईल.**

- 2 JUN 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Over 1,000 students take part in NSS camp at SUK

TIMES NEWS NETWORK

Rahul Gaikwad



Top 100 participants will be trained at the National Disaster Response Force academy later

**Kolhapur:** The state-level National Service Scheme (NSS) disaster management training camp Avhaan began on an enthusiastic note on Thursday at the Shivaji University, Kolhapur (SUK) campus.

Over 1,000 students across the have participated in the camp.

Devanand Shinde vice-chancellor of SUK said, "The participants should make the most of this opportunity. Students will learn about community service which can be used for the society in future."

"Participants must take care of themselves. In the disaster management, one of course focuses on saving the lives, but he/she should not overlook about oneself too," he added.

Communication officer of NSS Atul Salunkhe said, "The top 100 participants of Avhaan will be trained further at the National Disaster Response Force (NDRF) academy."

An SUK official said, "During the disaster management camp students will be trained about land disaster, water disaster, rehabilitation and life saving techniques."

"A formal inauguration of the camp will be done on Friday by Vishwas Nangre Patil, special Inspector General, Kolhapur Range," he added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 2 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठ परिसरात 'एफएसओएम'

कोल्हापूर टाइम्स टीम

रग्गेडियन क्लबच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी आयोजित करण्यात येणारा एफएसओएम (फर्स्ट संडे ऑफ मंथ) हा उपक्रम यंदा शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर येत्या रविवारी (ता. ४) सकाळी साडे सहा वाजता हा कार्यक्रम होईल.

व्यायाम, खिलाडूवृत्ती आणि क्रीडा संस्कृतीला चालना देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. 'टार्गेट-फिट कोल्हापूर' ही या उपक्रमाची टॅगलाइन आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'कल्चर क्लब'चे या उपक्रमाला सहकार्य लाभले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, हा उपक्रम पूर्णपणे मोफत असून, सर्व वयोगटासाठी खुला असेल.

सहकुटुंब सहभागी होता येणाऱ्या या उपक्रमात यंदा ट्रेल रन हा धावण्याचा प्रकार असणार आहे. सरळ रस्त्यावरून न धावता डोंगराळ भागातून निसर्गाचा अनुभव घेत खाच खळग्यांमधून धावणे, म्हणजे ट्रेल रन होय. शहरात नुकतीच पावसाळ्याची चाहूल लागल्याने अल्हाददायक वातावरणात धावण्याचा आनंद लुटता येणार आहे. यामध्ये चार ते पाच किमोमीटर धावावे लागणार आहे. अधिक माहितीसाठी ९६२३६८८८८६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUN 2017
Times of India

# Advisory against distance learning for MPhil, PhD

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** In an official University Grants Commission (UGC) circular on May 31, the body had warned the research scholars and students of taking admission in MPhil and PhD courses via distance learning.

As per UGC norms in 2016, no affiliated university was allowed to offer distance learning for PhD and MPhil courses.

Secretary of UGC Jaspal Sandhu said, "Students are advised not to take admission in any MPhil and PhD course offered by any university or institution through distance learning."

"It is informed that the UGC has allowed Indira Gandhi National Open University (IGNOU) and some other state open universities to conduct MPhil/PhD courses in full-time or part-time mode," he added.

Acting pro vice chancellor at the Shivaji University, Kolhapur (SUK) on the UGCs decision said, "It is a welcome decision and we will make sure that no student from our university falls into fake MPhil/PhD institution trap."

"The minimum standards that the UGC has put forward are quite stringent and quite necessary to make it efficient. The coursework component from the UGC is important in their guidelines," he said.

An SUK official said, "There used to be many complaints about the validity and the authenticity of the degree a few years ago; however after the UGC notice came into light, students got aware about the validity of any such degree."

"Many of the state universities have started their PhD admission process and this warning has come in an apt time. Students should take precaution when it comes to taking admission for either in MPhil or PhD courses," the official added.

# Varsity to conduct MPhil, PhD entrance exam from June 21

Times News Network

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will be conducting its PhD and MPhil entrance exam between June 21 and June 23.



An official SUK circular read, "The detailed schedule will be published on the SUK website soon."

Director of board of examinations and evaluation Mahesh Kakade said, "Subject wise schedule of MPhile and PhD entrance test will be published on the SUK website www.unishivaji.ac.in under the link MPhil/PhDadmission2017."

Updates with respect to the entrance test and admission procedure will be displayed on the official website from time to time. Candidates must keep visiting the above website frequently," he added.

"The entrance test will be of 100 marks (50 questions of two marks each with multiple choices). Candidates will qualify if they score 50% marks or more. There will be negative marking on incorrect answers," said an SUK official.

"There are over 500 seats for 47 subjects in PhD courses, while there are 100 seats for 22 subjects in MPhil courses," the official added.

It has to be noted that the University Grants Commission (UGC) earlier in the month of July 2016 had tweaked its guidelines for allowing the guides from under-graduate (UG) colleges to offer guideship to the MPhil and PhD candidates. The changes in the guidelines have been given a nod in the academic council this year.